**मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मिरा-भाईंदर ते वसई-विरार) या प्रकल्पाची (एकूण लांबी २५.०३ किमी) वसई खाडीवरील पांजू बेटाला जोडणाऱ्या सहा (३+३) पदरी उड्डाणपूल (४.९२ किमी) (सुभाषचंद्र बोस स्टेडीयम-नायगाव) व मेट्रो या एकात्मिक संरचनेसह उभारणी या प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास व सदर प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फ़त अंमलबजावणी करण्यास राज्य शासनाची मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.८९/नवि-७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : ०३ सप्टेंबर, २०२६.**

**<u>प्रस्तावना :-</u>**

मुंबई महानगर प्रदेशामध्ये अस्तित्वात असलेल्या उपनगरीय रेल्वे यंत्रणेवर अत्यंत ताण येतो आणि बस यंत्रणा ही प्रामुख्याने रेल्वे प्रवाशांसाठी फीडर सर्व्हिस (रेल्वे स्टेशनपर्यंत जोडणारी सेवा) पुरवण्यापुरतीच मर्यादित राहिली आहे. मुंबई शहर (बेटांचे शहर) आणि उपनगरांमधील जे भाग सध्याच्या उपनगरीय रेल्वे जाळ्याला जोडलेले नाहीत, तेथील नागरिकांना रेल्वे-आधारित सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'मुंबई मेट्रो बृहत आराखडा' हाती घेण्यात आला, जेणेकरून लोकांना अर्धा ते १ किमी अंतराच्या आत मेट्रो स्थानक गाठता येईल.

सद्यस्थितीत, मुंबई मेट्रो मार्गाच्या बृहत आराखड्याचा विस्तार सुमारे ३५५.७७ कि.मी. पर्यंत वाढविण्यात आला आहे. सदर बृहत आराखड्यामधील मेट्रो मार्गांपैकी मुंबई मेट्रो मार्ग - १ (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर), मुंबई मेट्रो मार्ग २अ (दहिसर (पूर्व) ते डी. एन. नगर) आणि मुंबई मेट्रो मार्ग - ७ (अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व)) हे प्रकल्प प्रवाशांच्या सेवेसाठी खुले करण्यात आलेले आहेत. मुंबई मेट्रो मार्ग २ (ब) - डी.एन.नगर - मंडाळे, चा टप्पा- १ (देशभक्त एन. जी. आचार्य उद्यान-डायमंड गार्डन, चेंबूर ते महाराष्ट्र नगर-मंडाले), तसेच मुंबई मेट्रो मार्ग - ९ (दहिसर ते मीरा-भाईंदर) चा टप्पा-१ (काशिगाव ते दहिसर (पू.)) हे मार्ग दि. ७ एप्रिल २०२६ रोजी पासून कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. मुंबई मेट्रो मार्ग २ (ब) (डी.एन.नगर -मंडाळे) चा उर्वरित भाग, मुंबई मेट्रो मार्ग ४ (वडाळा -घाटकोपर - मुलुंड - ठाणे-कासारवडवली), मुंबई मेट्रो मार्ग -५, मुंबई मेट्रो मार्ग-६, मुंबई मेट्रो मार्ग - ९ (दहिसर ते मीरा-भाईंदर) चा उर्वरित भाग आणि मुंबई मेट्रो मार्ग-१२ या मेट्रो प्रकल्पांच्या अंमलबजावणीचे काम प्रगतिपथावर आहे. मुंबई मेट्रो मार्ग- १० च्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरणामार्फत नियोजन चालू आले. तसेच, मुंबई मेट्रो मार्ग-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ (अंधेरी)) हा मेट्रो मार्ग मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फत प्रवाशांच्या सेवेसाठी खुला करण्यात आला आहे. सदर मास्टर प्लॅन कॉरिडॉरची जलद गतीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाने सादर केलेल्या, सुभाषचंद्र बोस स्टेडियम (SCBS), भाईंदर ते ग्लोबल सिटी, विरार दरम्यान मुंबई मेट्रो मार्ग-१३ या २५.०३ किमी लांबीच्या मेट्रो मार्गाची वसई खाडीवर ६ पदरी (३+३ lane)

रस्ता आणि मेट्रो असलेल्या एकत्रित पूलासह (Road cum metro bridge) (४.९२ किमी) (सुभाषचंद्र बोस स्टेडीयम-नायगाव) उभारणी या प्रकल्पास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहेः-

## ०२. शासन निर्णय :-

मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मिरा-भाईंदर ते वसई-विरार) (एकूण लांबी २५.०३ किमी) या मेट्रो मार्गिकेची वसई खाडीवरील पांजू बेटाला जोडणाऱ्या सहा (३+३) पदरी उड्डाणपूल व मेट्रो या एकात्मिक संरचनेसह उभारणी या प्रकल्पाचे एकात्मिक, शाश्वत व कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने असलेले महत्त्व लक्षात घेता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सादर केलेल्या मेट्रो रेल प्रकल्पाच्या प्रस्तावास पुढीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मिरा-भाईंदर ते वसई-विरार) या एकूण लांबी २५.०३ किमी (३.२५ कि.मी. भुयारी, २१.७८ कि.मी. उन्नत), १३ उन्नत स्थानके व ३ भूमिगत स्थानके असलेल्या तसेच, वसई खाडीवरील पांजू बेटाला जोडणारा सहा (३+३) पदरी उड्डाणपूल (सुभाषचंद्र बोस स्टेडीयम-नायगाव) (लांबी ४.९२ किमी) व मेट्रो मार्ग अशी एकात्मिक संरचना असलेल्या एकूण रु. १७,७२४.९९ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा (एमएमआरडीए) मार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मिरा-भाईंदर ते वसई-विरार) या मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी सोबतच्या परिशिष्ट-३ मध्ये नमूद केलेल्या वित्तीय सहभागाद्वारे निधी उभारुन अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाचे/स्थानिक कर, केंद्र सरकारच्या ५०% करांकरीता व खासगी जमिनीच्या संपादनाकरीता राज्य शासनाकडून एकूण रू. २८१०.३६ कोटी इतके बिनव्याजी दुय्यम कर्ज (subordinate debt) प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (प्रकल्पासाठी आवश्यक कायमस्वरुपी व तात्पुरत्या शासकीय जमिनी (रु. १०२७.२६ कोटी) या नाममात्र दराने प्राधिकरणास प्राप्त होणार असल्याने, त्यासाठी राज्य शासनाकडून रु. १०२७.२६ कोटी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.)

४) सदर प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या मुख्य कर्जाची परतफेड केल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) सदर दुय्यम कर्जाची परतफेड वितरीत केल्याच्या प्रमाणात एका हप्त्यात करण्याबाबत, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निर्देश देण्यात येत आहेत.

५) सदर प्रकल्पासाठी राज्य सरकारकडून दिल्या जाणाऱ्या बिनव्याजी दुय्यम कर्जाच्या अटी व शर्ती, मूळ रक्कमेची परतफेड आणि इतर संबंधित बाबींबाबत, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव/सचिव, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव (नवि-१) आणि मुंबई मेट्रो रेल

कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक यांच्यात पूरक वित्तीय करारनामा (Subsidiary Loan Agreement - SLA) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थांद्वारे किंवा इतर वित्तीय एजन्सीकडून रु. १३,२९३.७४ कोटी रकमेच्या मर्यादेत द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्था/अन्य वित्तीय संस्थामार्फत सुलभ व्याज दराचे कर्ज Back to Back Basis किंवा इतर उचित मार्गाने (Pass Through Assistance-PTA) संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्थांद्वारे घेण्यास राज्य शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कर्ज घेण्याच्या अनुषंगाने वित्तीय संस्था ही वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या पूर्व मान्यतेने निवडावी. तसेच इतर पुढील कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७) सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांच्या परतफेडीची प्राथमिक जबाबदारी ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची राहील.

८) सदर नमूद मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांच्या परतफेडीची दायित्व/आकस्मिक जबाबदारी राज्य शासनाद्वारे स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कर्ज सहाय्यासाठी आवश्यकता भासल्यास राज्य शासनाकडून हमी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फ़त राबविण्यात येत असलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या रोख प्रवाहाबाबतची माहिती त्रैमासिक आधारावर वित्त विभागाला सादर करण्यात यावी.

१०) सदर मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य कर्ज सहाय्याच्या अनुषंगाने संबंधित वित्तीय संस्था आणि केंद्र शासन यांच्यात कर्ज करारनामा करण्यास तसेच संबंधित वित्तीय संस्था, राज्य शासन (नगर विकास विभाग), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यात प्रकल्प करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११) सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य सहाय्यित कर्ज उचलण्यासाठी मुदतवाढ देण्याची आवश्यकता भासल्यास त्यास वित्त विभागाच्या स्तरावरुन मान्यता देण्यास व केंद्र शासनास तशी विनंती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१२) सदर प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फ़त द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थांद्वारे किंवा इतर वित्तीय एजन्सीकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांची वेळोवेळी परतफ़ेड होईल तसेच याचा भार राज्य शासनावर येणार नाही, याची दक्षता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घ्यावी.

१३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ला सोबतच्या परिशिष्ट-३ मध्ये नमूद वित्तीय आराखड्यानुसार राज्य शासनाने सोसावयाच्या निधीपेक्षा अधिकचा निधी सदर प्रकल्पास उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१४) सदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी आवश्यक असणाऱ्या कायमस्वरुपी जमीनी (प्रकल्प किंमतीत समाविष्ट असणाऱ्या) एमएमआरडीएला नाममात्र दराने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१५) मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मिरा-भाईंदर ते वसई-विरार) प्रकल्पासाठी आवश्यक असलेली शासकीय/निमशासकीय जमीन नाममात्र दराने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास (एमएमआरडीए) प्रदान करावी, यासाठी संबंधित विभागांना/शासकीय संस्था/निमशासकीय संस्थांना निर्देश देण्यात येत आहेत.

१६) मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मीरा-भाईंदर ते वसई-विरार) प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत मेट्रो मार्गाच्या आसपासच्या मोकळया जागांचा तात्पुरता वापर करण्यासाठी परवानगी देण्याबाबत संबंधित शासकीय आणि निमशासकीय विभागांना/कार्यालयांना निर्देश देण्यात येत आहेत. तसेच, संबंधित विभागांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला या मोकळया जागा रु.१/- (एक रुपया) च्या नाममात्र दराने उपलब्ध करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

१७) मेट्रो मार्ग-१३ (मीरा-भाईंदर ते वसई-विरार) या मेट्रो मार्गाच्या बाजूला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला विकसनासाठी आवश्यक असलेल्या कायमस्वरूपी जमीनीचे प्रचलित दराने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्यासाठी संबंधित शासकीय/निमशासकीय विभागांना/प्राधिकरणांना आवश्यक निर्देश देण्यात येत आहेत.

१८) सोबतच्या परिशिष्ट-५ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे भाडेदरांस मान्यता देण्यात येत आहे. तसेच, उल्लेखीत भाडेदरांत मेट्रो रेल प्रकल्प सुरू करण्यापूर्वी प्रकल्पाची वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास, शासनाच्या पूर्व मान्यतेने, आवश्यक ते बदल करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ला निर्देश देण्यात येत आहेत. मेट्रो कायद्यानुसार भाडेदरात पुढील बदल करण्याचे अधिकार भाडे निर्धारण समितीला (Fare Fixation Committee) आहेत, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

१९) सदर मेट्रो प्रकल्प "मेट्रो रेल्वे (कामांची बांधणी) कायदा, २००९" च्या तरतुदींच्या अनुषंगाने अंमलात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२०) सदर मेट्रो रेल्वे प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांकरीता व तसेच कारडेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६/नविन केंद्रीय भूसंपादन व पूनर्वसन व पूनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत अथवा विकास हक्क/विकास हक्क हस्तांतरण यांचे माध्यमातून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२१) भूसंपादन प्रक्रियेमुळे प्रकल्प अंमलबजावणीस विलंब होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता प्राधिकरणाने घ्यावी.

२२) सदर मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मीरा-भाईंदर ते वसई-विरार) प्रकल्पाला विविध प्रयोजनार्थ (उदाहरणार्थ, महाराष्ट्र प्रदेश आणि नगर नियोजन कायदा, १९६६ च्या कलम १२४B, महाराष्ट्र नगरपालिका कायदा, १९४९ च्या कलम १४९ तसेच इतर संबंधित कायदे/नियम) “महत्त्वपूर्ण सार्वजनिक प्रकल्प” आणि “महत्त्वपूर्ण शहरी वाहतूक प्रकल्प” म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात यावी.

२३) सदर मेट्रो प्रकल्पाच्या मार्गिकेमध्ये तसेच मेट्रो स्थानकांमध्ये गरज वाटल्यास किरकोळ बदल करण्यास, प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये अथवा प्रकल्पाच्या खर्चात वाढ होत असल्यास त्यास शासनाची पूर्व मान्यता घेण्याच्या अटीवर, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२४) सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत, प्रकल्पामधुन मिळणारा परतावा याकरिता प्रकल्प अहवालात घेण्यात आलेल्या गृहीतकांची कसोशीने तपासणी करणे व ह्या बाबींवर स्वतंत्र अभिप्राय (Second opinion) घेण्याची कार्यवाही करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरसडीए) ला निर्देश देण्यात येत आहेत.

२५) मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मीरा-भाईंदर ते वसई-विरार) प्रकल्पाच्या संरेखनासाठी/प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून नियुक्ती करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

२६) सदर प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प पुर्णत्व खर्चामध्ये किंमतवाढ, चलन विनिमय दरांतील बदल, प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये बदल, डीपीआरमध्ये न दर्शविलेल्या आवश्यक बाबींचा समावेश, प्रकल्प उभारणीच्या विहीत मुदतीमध्ये वा त्यापुढे टाळता येणारा विलंब, अशा कारणांमुळे वाढ झाल्यास असा वाढीव खर्च स्थानिक प्राधिकरण, शासकीय/निम शासकीय संस्था त्यांच्याकडील जमिनी (डीपीआरमध्ये दर्शविलेल्या जमिनीव्यतिरिक्त) एमएमआरडीए यांनी उपलब्ध करून घेऊन अशा जमिनीचे विकसन करून टीओडी, एफएसआय व इतर अनुषंगिक माध्यमातून निर्माण होणाऱ्या आर्थिक स्त्रोतामधून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२७) सदर प्रकल्पाच्या खर्चात कोणत्याही कारणाने वाढ झाल्यास, सदर वाढीचा संपूर्ण भार/दायित्व घेण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ला निर्देश देण्यात येत आहेत.

२८) सदर प्रकल्पाच्या खर्चात भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहतीकरण यामधील विलंबामुळे वाढ होणार नाही याची दक्षता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी घ्यावी.

२९) सोबतच्या परिशिष्ट-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे "समर्पित नागरी परिवहन निधी" च्या उभारणीस आणि इतर स्रोतामधून उपलब्ध झालेला निधी "समर्पित नागरी परिवहन निधी" मध्ये जमा करुन तो निधी सदर प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, कार्य व देखभाल (O&M), भविष्यात

येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी इ. साठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३०) या प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी एमयुटीपी प्रकल्पासाठी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प-१७००/सीआर-३१/स्लम-२, दिनांक १२.१२.२००० अन्वये लागू केलेले पुनर्वसन धोरण सदर प्रकल्पासही लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना निर्देश देण्यात येत आहेत. या प्रकल्पांमधील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी नागरी क्षेत्रात ज्या ठिकाणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सदनिका उपलब्ध होत नसतील त्या ठिकाणी नगर विकास विभाग शा.नि. क्र चंमपा-२०१७/प्र.क्र.२३/न.वि.-२६ दिनांक १३.०६.२०१८ मधील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अतिक्रमणधारकांना एकरकमी मोबदला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३१) राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पातील प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दि.१५ मार्च, २०२४ अन्वये राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पांच्या समन्वयासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती (High Power Committee) गठीत करण्यात आली आहे. सदरहू प्रकल्प हा उच्चाधिकार समितीच्या (High Power Committee) कार्यकक्षेत आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३२) महाराष्ट्र प्रदेश आणि नगर नियोजन कायदा, १९६६ च्या तरतुदींनुसार मुंबई मेट्रो मार्गिका-१३ अंतर्गत प्रकल्पांसाठी ट्रांझिट-ओरियंटेड डेव्हलपमेंट (TOD) अंमलात आणण्यासाठी तत्त्वतः मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ट्रांझिट ओरियंटेड डेव्हलपमेंट (TOD) अंमलात आणणे व त्याच्या महसूलाचा कालबद्ध आराखडा प्रकल्पाचे बांधकाम सुरु झाल्यानंतर ६ महिन्यात शासनाच्या अवलोकनार्थ सादर करण्याबाबत प्राधिकरणास सूचना देण्यात येत आहेत.

३३) सदर मेट्रो रेल प्रकल्पाच्या बांधकाम खर्चात अवाजवी वाढ होणार नाही याची दक्षता घेऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रकल्पाची उभारणी विहित मुदतीत करावी.

३४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम १५ दिवसात शासनास सादर करावा.

३५) सदर प्रकल्पाचे PM Gati Shakti उपक्रमांतर्गत Network Planning Group (NPG) मार्फत परीक्षण (Scrutiny) करण्यात यावे.

३६) सदर प्रकल्प पंतप्रधान गती शक्ती पोर्टलवर अपलोड करण्याबाबत व सदर प्रकल्पास महाराष्ट्र युनिक इन्फ्रास्टक्चर आयडी (MHUID) देण्याबाबतची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी करावी.

३७) यापुढे सादर होणाऱ्या मेट्रो प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये बस जोडणी (Bus Connectivity) होण्यासाठी, बसेस खरेदी करण्याकरीता एकूण प्रकल्प किंमतीच्या १% रक्कमेचा समावेश सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये करण्याकरीता संबंधित मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी संस्थांना निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरहु १% रक्कम ही प्रकल्प किंमतीच्या अतिरीक्त असेल.

**०३.** हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाने दिलेले अभिप्राय, दिनांक १८/०८/२०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

**०४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९०३१५३२४२०१२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAY KARBHARI
CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.09.03 15:33:41 +05'30'

**(विजय चौधरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ़) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
११. आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका, विरार.
१२. सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर.
१४. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१६. निवड नस्ती (नवि-७).

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.८९/नवि-७, दि. ०३/०९/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट-१

मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मिरा-भाईंदर ते वसई-विरार) या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १. | स्टॅन्डर्ड गेज | १४३५ मि.मी. |
| २. | मेट्रो मार्गाची लांबी | २५.०३१ कि. मी.<br>(३.२५ कि.मी. भुयारी, २१.७८ कि.मी. उन्नत ) |
| ३. | एकूण स्थानके | १६ (१३ उन्नत, ३ भूमिगत) |
| ४. | प्रस्तावित कार डेपो | चिखल डोंगरी, विरार. ११.६२५ हे. |
| ५. | कायमस्वरुपी आवश्यक जमीन | २४.८४ हे. |
| ६. | तात्पुरती आवश्यक जमीन (बांधकाम कालावधी दरम्यान) | २२.७६ हे. |
| ७. | प्रकल्प पूर्णत्वाचा कालावधी | सन २०२६-२०३१ |
| ८. | मूळ किंमत (भूसंपादन, कर, सामान्य शुल्क व आकस्मिक खर्च वगळता) | रु. ९१६२.२३ कोटी |
| ९. | जमिनीची किंमत | रु. २५६२.७९कोटी |
| १०. | राज्य शासनाचा कर | रु. ६९७.८७ कोटी |
| ११. | केंद्र शासनाचा कर | रु. ११५३.९१५ कोटी |
| १२. | आकस्मिकता खर्च (३%) (जमीन व सामान्य शुल्क वगळता) | रु. ३३०.४२ कोटी |
| १३. | सामान्य शुल्क design charges (५%) (जमीन वगळता) | रु. ५५०.७० कोटी |
| १४. | प्रकल्पाची मूळ किंमत (सर्व करांसह+सामान्य शुल्क+आकस्मिकता खर्च इ. सह) | रु. ११८९५.१४ कोटी |
| १५. | प्रकल्पाची किंमत (जमिनीच्या किंमतीसह) | रु. १४४५७.९३ |
| १६. | बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज | रु. १३८२.५७ कोटी |
| १७. | दरवाढ | रु. १८८४.४९ कोटी |
| १८. | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत | **रु. १७,७२४.९९ कोटी** |
| १९. | आर्थिक अंतर्गत परतावा दर (EIRR) | **१४.४२ %** |
| २०. | वित्तीय अंतर्गत परतावा दर (FIRR) | **५.१९ %** |
| २१. | प्रवासी क्षमता (६ डब्यांची गाडी) | ६ प्रवासी प्रति चौरस मिटर - १८०० |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.09.03 15:34:04 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.८९/नवि-७, दि. ०३/०९/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-२

## मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मिरा-भाईंदर ते वसई-विरार) या प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील

| अ.क्र. | तपशील | रक्कम रु. कोटीमध्ये |
|---|---|---|
| १. | अभियांत्रिकी किंमत (जुलै २०२५ च्या किंमतीवर आधारीत) | ९१६२.२३ |
| २. | जमीनी संबंधित किंमत (जमीन अधिग्रहण) | २५६२.७९ |
| ३. | आराखड्याच्या खर्चासह सामान्य किंमत | ५५०.७० |
| ४. | आकस्मिक किंमत @ ३% | ३३०.४२ |
| ५. | एकूण कर | १८५१.७९ |
| ६. | **एकूण सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) किंमत.** | **१४,४५७.९३** |
| ७. | बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज (IDC) /वित्तीय शुल्क | १३८२.५७ |
| ८. | दरवाढ | १८८४.४९ |
| ९. | **एकूण प्रकल्प पूर्णत्वाची किंमत** | **१७,७२४.९९** |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.09.03 15:34:19 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.८९/नवि-७, दि. ०३/०९/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-३

## मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मिरा-भाईंदर ते वसई-विरार) या प्रकल्पाचा वित्तीय सहभाग आराखडा

| अ. क्र | आर्थिक सहभागी संस्था | पूर्णत्वाची किंमत (रु.कोटी) |
|---|---|---|
| १ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग | ५९३.६३ |
| २ | राज्य शासनाचा सहभाग (**बिनव्याजी** दुय्यम कर्ज स्वरुपात)<br>अ) केंद्रीय कराच्या ५० % भाग रु. ५७६.९६ कोटी<br>ब) राज्य स्तरीय/स्थानिक कराकरिता रु. ६९७.८७ कोटी<br>क) खासगी जमिनीच्या संपादनाकरीता खर्चाची तरतूद रू. १५३५.५३ कोटी | २८१०.३६ |
| ३ | बाह्य कर्ज सहाय्य (द्विपक्षीय /बहुपक्षीय /आंतरराष्ट्रीय /अंतरदेशीय विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज सहाय्य) | १३,२९३.७४ |
| ४ | नाममात्र दराने उपलब्ध करुन द्यावयाच्या शासकीय कायमस्वरूपी व तात्पुरत्या स्वरूपातील जमिनीची किंमत * | १०२७.२६ |
| | **एकूण पूर्णत्वाची किंमत** | **१७,७२४.९९** |

*** प्रकल्पासाठी आवश्यक कायमस्वरुपी व तात्पुरत्या शासकीय जमिनी (रु. १०२७.२६ कोटी) या नाममात्र दराने प्राधिकरणास प्राप्त होणार असल्याने, त्यासाठी राज्य शासनाकडून रु. १०२७.२६ कोटी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.**

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.09.03 15:34:35 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.८९/नवि-७, दि. ०३/०९/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

## परिशिष्ट-४

### प्रकल्प राबविण्याकरीता लागणारा निधी उभारण्याचे इतर विविध स्रोत :-

a. मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करुन त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व अशा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकापोटी वसूल केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम सदर मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेकडे/ राज्य शासनाच्या नागरी परिवहन निधिमध्ये वर्ग करणे.

b. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदींनुसार महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात विकास शुल्कात १००% पर्यंत वाढ करून आकारण्याविषयी कायद्यातील तरतूदीनुसार महानगरपालिका/नियोजन प्राधिकरण क्षेत्रात वसूल होणाऱ्या रक्कमेमधून सदर वाढीव विकास शुल्काची रक्कम राज्य स्तरावरील नागरी परिवहन निधीमध्ये वर्ग करणे.

c. महत्वाकांक्षी नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात मालमत्तेचे मुद्रांक शुल्कासोबतच १ टक्के अधिभार लावण्याची तरतूद सन २०१५ चा अधिनिमय क्र.३५ दिनांक २१.०८.२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४९ ब मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर प्रयोजनातून प्राप्त रक्कम विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी वापरणे.

d. मेट्रो कार डेपोच्या जागा तसेच प्रकल्प अंमलबजावणी संस्थेला हस्तांतरीत जमिनींच्या वाणिज्यिक विकसनाव्दारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

e. मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या आगमन/निर्गमन ठिकाणी, स्थानकांच्या नावांचे ब्रँडींग, डेपो, स्थानकांवरील जाहिरात तसेच ट्रेन कोचेस रॅपिंग च्या माध्यमातून जाहिरात व पार्कीगपासून मिळणारे उत्पन्न या प्रकल्पासाठी वापरणे इ.

f. मेट्रो स्थानकांवर स्थित किऑस्क, एटीएम सेंटर्स इ. माध्यमातून मिळणारे उत्पन्न.

g. सदर विविध स्रोतांतून प्राप्त होणारा निधी हा एका "समर्पित नागरी परिवहन निधीमध्ये" जमा करावयाचा असून तो निधी सदर प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, कार्य व देखभाल (O&M), भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी इ. साठी प्रकल्प अंमलबजावणी संस्थेस वापरण्यास मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

प्रचालनादरम्यान मालमत्ता व्यवसाय आणि जाहिराती यांद्वारे तिकीट भाड्यामधून प्राप्त महसुलाच्या १०% इतके उत्पन्न अंदाजित केले गेले आहे. मेट्रो स्थानकांवरील आणि कार डेपोवरील मालमत्तेचा विकास करणे, स्थानकांवरील पार्किंग हक्कांचे लीजिंग, कोचेस आणि तिकिटांवर जाहिराती, स्थानकांमध्ये आणि पार्किंग लॉट्समध्ये जाहिराती, व्हायडक्ट्स, कॉलम्स आणि इतर मेट्रो संरचनांवर जाहिराती, कॉर्पोरेट क्षेत्रासाठी को-ब्रँडिंग आणि नामकरण हक्क, मेट्रो परिसरामधील चित्रपटांचे चित्रीकरण आणि विविध विशेष कार्यक्रमांच्या (Events) आयोजनाद्वारे संसाधने उभारण्यात येतील.

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.09.03 15:34:51 +05'30'

**(विजय चौधरी)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.८९/नवि-७, दि. ०३/०९/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

**परिशिष्ट-५**

**मुंबई मेट्रो मार्ग-१३ (मिरा-भाईंदर ते वसई-विरार) या प्रकल्पाची तिकीट भाडे संरचना :**

वाहन सर्वेक्षण आणि प्रवासी संख्या अंदाजासाठी विचारात घेतलेल्या भाडे संरचनेचा वापर प्रकल्पाच्या FIRR (Financial Internal Rate of Return) च्या गणनेसाठी मूलभूत भाडे म्हणून केला गेला आहे. FIRR गणनेसाठी विद्यमान भाडे संरचनेवर दोन वर्षांनी १४ % चा वाढीचा घटक लागू करण्यात आला आहे, जो किंमतीच्या निर्देशांकातील सरासरी कल (Trend) आणि परिचालन खर्चाच्या माहितीवर (Input) आधारित आहे.

| *अंतर (कि.मी.)* | ० - ३ | ३ - १२ | १२ - १८ | १८ - २४ | २४-३० | ३० - ३६ | ३६ - ४२ | >४२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| *भाडे (रु.)* | १० | २० | ३० | ४० | ५० | ६० | ७० | ८० |

वरील भाडे दरांच्या आधारे, प्रस्तावित आहे की मेट्रो रेल प्रकल्पाच्या प्रारंभापूर्वी, प्रकल्पाच्या आर्थिक कार्यक्षमतेची तपासणी करण्यात यावे आणि आवश्यक असल्यास, शासनाची पूर्व परवानगी घेऊन आवश्यक ते बदल केले जावेत. मेट्रो कायद्यानुसार, भविष्यकालीन भाडे दरात बदल करण्याचे अधिकार भाडे निश्चिती समितीकडे आहेत.

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.09.03 15:35:08 +05'30'

**(विजय चौधरी)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**